# मुंबई विद्यापीठ

## शुध्दीपत्रक

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/३८७.**

जाहीर प्रकटन क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/३६७, दिनांक २६ जुलै, २०२३ अन्वये नोंदणीकृत पदवीधरांची अंतिम मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जदारांची यादी गुरूवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Electoral Roll या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने या शुध्दीपत्रकान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त दिनांकास प्रसिध्द करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाच्या मतदारयादीमध्ये काही मतदारांच्या नावांची नोंद दोनवेळा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार अशा मतदारांच्या नावांची शहानिशा करून पुन:श्च अंतिम मतदारयादी (सुधारीत) प्रसिध्द करण्यात येत आहे.

अंतिम मतदार यादी (सुधारीत) विद्यापीठाच्या https://mu.ac.in या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Electoral Roll या सदराखाली (Tab) प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच अंतिम मतदार यादी (सुधारीत) प्रसिध्द झाल्याबद्दलची माहिती संक्षिप्त संदेश (SMS) द्वारे संबंधितांना कळविण्यात आलेली आहे.

तसेच मतदारांनी आपला अर्ज कोणत्या यादीमध्ये आहे हे शोधण्यासाठी **“Search Registered Graduate Applications”** या **Tab** वर **Click** करावे. त्यामध्ये मतदारांनी त्यांचे नाव किंवा मोबाईल नंबर किंवा अर्ज क्रमांक टाकून आपला अर्ज पात्र किंवा अपात्र यादीमध्ये आहे, याची माहिती घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ०९ ऑगस्ट, २०२३.
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.